# कावळा आणि कोकिळा : संघर्ष की सहकार्य?

## लेखक : कालू राम शर्मा

उन्हाळ्याच्या दिवसांत आपण अनेकदा कावळे चोचीत वाळलेल्या काड्या घेऊन झाडांकडे उडत जाताना पाहतो. एप्रिल ते जून या काळात त्यांची ही लगबग अधिक दिसून येते. कावळ्याचे घरटे साधेसे, झाडाच्या दोन फांद्यांच्या बेचक्यांमध्ये विखुरलेल्या काड्यांचे बनलेले असते.

मध्यंतरी मी मध्यप्रदेशातल्या काही गावांमधून फिरत होतो तेव्हा असं लक्षात आलं, की कावळ्यांनी बरीच घरटी बनवली होती. विशेष म्हणजे यासाठी कावळ्यांनी पाने गळून गेलेली झाडे निवडली होती. पानं गळून गेल्यावर झाडाची एकनएक फांदी उघडी पडते. जेव्हा पानं असतात, तेव्हा कितीतरी पक्षी त्यावर घरटी करतात. पानांमुळे ती झाकली जातात. पण इथे तर कावळ्यांनी पानं नसलेल्या फांद्यांवर घरटी



कावळ्याची घरटी - कावळे साधारणपणे मार्च आणि एप्रिलच्या शेवटी घरटी बांधायला सुरूवात करतात. घरटी जमिनीपासून ३ ते ४ मीटर उंचीवर असतात.

केली होती. पिंपळाच्या झाडावर सर्वाधिक घरटी होती. एकेका पिंपळाच्या झाडावर सात ते दहा घरटी दिसली. दाट पानं नसलेल्या झाडांवर घरटी करायचं एक कारण हे असेल, की घरटयातून सगळीकडे नजर ठेवता येईल आणि बाहेर गेल्यावर दूरवरून घरट्यावर लक्ष ठेवता येईल. कावळ्यांची घरटी जमिनीपासून साधारण ३ ते ४ मीटर उंचीवर असतात. कावळा आणि कावळी मिळून घरटे बांधतात आणि अंडी व पिलांच्या संगोपनाची जबाबदारीही दोघे मिळून पार पाडतात.

गमतीची गोष्ट म्हणजे कावळा आणि कोकीळ यांचा प्रजनन काल साधारण एकच असतो. इकडे कावळे घरट्यासाठी एकेक काडी जमवायला लागतात आणि तिकडे याच काळात कोकिळेचा मधुर 'कुहू-कुहू' स्वर वातावरणात घुमू लागतो. नर कोकीळ आपल्या जोडीदाराला आकर्षित करण्यासाठी आणि दुसऱ्या प्रतिस्पर्धी नराला डिवचण्यासाठी जोरजोरात कुहू-कुहू करू लागतो. पण स्वतः कोकिळा मात्र घरटे बांधण्याच्या कटकटीपासून दूर राहते.



कावळ्याचं घरटं अगदी साधंसं दिसतं. लांबून पाहिल्यावर वाटेल, हा तर नुसता काड्यांचा ढीग आहे. पण खरं म्हणजे अनेक आठवडे राबून कावळ्याने हे घरटं बांधलेलं असतं. कावळे अंडी द्यायच्या कितीतरी आधी एकेक काडी लक्षपूर्वक निवडून

एकत्र आणतात. झाडाच्या एखाद्या मजबूत फांदीच्या आधारे या काड्या रचल्या जातात. त्यात एखादी धातूची तारही असू शकते. हा वाढत्या शहरीकरणाचा परिणाम असावा.

कोकिळा तिची अंडी कावळ्याच्या घरट्यात घालते. जैवविकासाच्या टप्प्यातली ही आश्चर्याची गोष्ट आहे. कावळा खरं तर चतुर समजला जातो. पण तो कोकिळेची अंडी स्वतःचीच समजून उबवतो आणि कोकिळेच्या पिलांचे संगोपनही करतो.

केंब्रिज विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांना असं आढळलं की कोकिळेचे पंख छोट्या चिमणी बाज किंवा बहिरी ससाण्याच्या पंखांसारखे असतात. त्यामुळे इतर पक्षी घाबरतात. याचाच फायदा घेऊन कोकिळा कावळ्याच्या घरट्यात अंडी घालते. बहिरी ससाणा हा इतर पक्षी आणि प्राण्यांची शिकार करतो. त्याला पक्षी घाबरतात. शास्त्रज्ञांनी एका प्रयोगात एक नकली ससाणा आणि एक नकली कोकीळ एका गाणाऱ्या पक्ष्याच्या घरट्याजवळ ठेवला तर तो पक्षी या दोघांनाही घाबरला.

## परजीवी - यजमान संबंध

ही निसर्गातील एक विलक्षण योजना आहे - जैविक भाषेत याला 'परजीवी - यजमान संबंध' म्हणतात. म्हणजेच कोकिळा कावळ्याच्या घरट्यात परजीवी आहे. कोकिळा वेगवेगळ्या प्रजातीच्या पक्ष्यांच्या घरट्यात अंडी घालून जबाबदारी झटकतात. पण कावळी मात्र स्वतःचीच अंडी समजून त्यांचे संगोपन करते.

साधारणपणे परजीवी संबंधांमध्ये यजमानाला नुकसान होतं, असं समजलं जातं. पण अशा परजीवी पक्ष्यांवर केलेल्या संशोधनातून असे दिसून आले आहे, की यातून

यजमानालाही फायदा होतो. संशोधन सांगते की कोकिळेच्या पिलांमुळे कावळ्याच्या पिलांची अंगावर चिकटणाऱ्या परजीवी कीटकांपासून सुटका होते. त्यामुळे घरट्यातील कावळ्याची पिल्ले सुरक्षित राहतात.



**कावळी कोकिळेची अंडी उबवते आणि त्यातून बाहेर आलेल्या पिल्लांचे संगोपनही करते.**

स्पेनमधल्या संशोधकांनी सांगितलं, की ग्रेट स्पॉटेड जातीच्या कोकिळेने ज्या कावळ्यांच्या घरट्यात अंडी घातली होती, त्या घरट्यातली कावळ्याची अंडी अधिक चांगल्या प्रकारे उबवली गेली आणि त्यातून पिल्लं बाहेर आली. अजून एका संशोधनात असं दिसलं की, कॅरियन कावळ्यांच्या ज्या घरट्यात कोकिळेने अंडी घातली होती त्यातल्या पिल्लांचे जिवंत राहण्याचे प्रमाण कोकिळेची अंडी नसलेल्या घरट्यांपेक्षा जास्त होते.

एका संशोधनानुसार कोकिळेच्या पिल्लांजवळ संरक्षणासाठी उपाय असतो. शिकारी मांजरासारखा एखादा शत्रू प्राणी जवळ आला, की ती एक विशिष्ट दुर्गंधी सोडतात. ही दुर्गंधी कीटकांना पळवून लावणाऱ्या रसायनामुळे (Repellent) असते आणि ती भक्षक प्राणी व पक्ष्यांना दूर पळवते. म्हणजेच हे नाते केवळ शोषणाचे नसून सहकार्याचेही आहे.

**कावळ्यांचे संरक्षण गरजेचे आहे.**

गेल्या वीस बावीस वर्षांत अनेक भागांतील कावळ्यांची संख्या कमी होऊ लागली आहे. कावळ्यांना जिवंत ठेवण्यासाठी त्यांची घरटी पण सुरक्षित ठेवली पाहिजेत. कोकिळेचा गोड स्वर ऐकायचा असेल तर कावळ्यांनाही जपले पाहिजे.

कावळ्यांची संख्या कमी झाली, तर कोकीळ अंडी घालण्यासाठी इतर पक्ष्यांची घरटी शोधतात. अमेरिका, आफ्रिका, युरोप, ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये कोकिळा इतर पक्ष्यांच्या घरट्यात अंडी घालते. ते पक्षी ती अंडी उबवतात. म्हणजे कोकिळेची अशी मैत्री इतर पक्ष्यांशी सुद्धा असते.  पण आपल्याकडे मात्र कोकिळा यासाठी कावळ्यांवरच अवलंबून असते.

पक्षी घरटे बांधताना सुरक्षेचे सर्व पैलू लक्षात घेतात. डीजे वगैरे सारखा कल्लोळ त्यांना सहन होत नाही. खरं म्हणजे पक्ष्यांना आवाजाचा त्रासच होतो, विशेषतः प्रजनन काळात तर त्यांना आवाज अजिबात सहन होत नाही. त्यांच्या घरट्यांना कोणी हात लावला तर ते घरटे ते सोडून देतात, हे तर आपल्याला माहिती आहेच. त्यामुळे फोटोग्राफर लोकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की घरट्याच्या जास्त जवळ जाऊन फोटो काढू नयेत. फ्लॅशमुळे पक्षी विचलित होतात.

कावळे आणि कोकीळ एकमेकांच्या सहकार्याने राहतात. त्यांच्यासाठी आणि एकूणच पक्ष्यांसाठी आपण काय करू शकतो? पक्ष्यांना त्यांचा अधिवास मिळवून देणे,

वृक्षतोड टाळणे, घरट्यांच्या आसपास गोंगाट कमी ठेवणे, त्यांच्या पिलांना त्रास न देणे, फोटो काढताना फार जवळ न जाणे; ही सगळी काळजी घेणे गरजेचे आहे.

*हिंदी शैक्षणिक संदर्भ अंक १५६ मधून साभार.*

§§§

---

**लेखक : कालू राम शर्मा**, अजीम प्रेमजी फाउंडेशन, खरगोन येथे कार्यरत होते. शालेय शिक्षणावर सातत्याने लेखन, फोटोग्राफीचा छंद. एकलव्यच्या सुरुवातीच्या काळात धार, उज्जैन, माळवा इत्यादी ठिकाणी केंद्र स्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका निभावली आहे.

**अनुवाद : यशश्री पुणेकर**, शैक्षणिक संदर्भ गटात सहभागी.

**इ-मेल :** yashashreegpunekar@gmail.com

***(कळीचे शब्द :- कावळ्याचे घरटे, कोकिळेची अंडी, पक्ष्यांचे सहजीवन, परजीवी-यजमान संबंध)***

*शैक्षणिक संदर्भ अंक ११२ जून-जुलै २०१८, अंक ११३ ऑगस्ट-सप्टेंबर २०१८ तसेच अंक ११९ ऑगस्ट-सप्टेंबर २०१९ हे वैज्ञानिक दृष्टिकोन विशेषांक होते.*

*हे आणि संदर्भचे इतरही अंक संदर्भ सोसायटीच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. जरूर वाचा.*

***www.sandarbhsociety.org***